# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०८ मार्च, २०२३ / फाल्गुन १७, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **बंदरे, खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### आष्टी (जि.बीड) तालुक्यातील देवस्थानाच्या इनामी जमिनींबाबत

**(१) * ६०२९० श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) तालुक्यातील देवस्थानाच्या इनामी जमिनी तेथील लोकप्रतिनिधीनी नातेवाईक व कार्यकर्त्यांच्या नावावर करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याची तक्रार तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे सिध्द होऊन मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास गुन्हा दाखल करण्याचे आदेश त्यांच्या दि. १८/१०/२०२२ रोजीच्या निकालाद्वारे देऊनही तसेच मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील आरोपीची याचिका दि. २५/११/२०२२ रोजी फेटाळण्यात येऊनही अद्याप गुन्हेगारांना अटक करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिस विभागाकडून सदर तपासाची दिशा बदलून मुख्य सुत्रधार आरोपींना वाचविण्याचे व पुरावे नष्ट करण्याची संधी देऊन आरोपिविरुध्द १७ (अ) ची परवानगी शासनाने जाणीवपूर्वक दिली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तक्रारदार सामाजिक कार्यकर्त्यांच्या जीवास धोका निर्माण होऊ शकतो यास्तव त्यांनी दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजीपासून आमरण उपोषणास बसण्याचा मानस व्यक्त करुन तशी निवेदने पोलिस महासंचालक (ला.प्र.वि.) यांचेसह सर्व संबंधित पोलिस प्रशासनास सादर करुन महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी येथील कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२) प्रस्तुत प्रकरणी पोलीस ठाणे, आष्टी, जिल्हा-बीड येथे दिनांक २९.११.२०२२ रोजी गु.र.नं.३८६/२०२२ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-१९८८ (सुधारणा २०१८) चे कलम १३ (१) (अ)(ब), १३(२) तसेच

भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), १०९ अन्वये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे. तसेच सदर प्रकरणी सबळ पुरावे हस्तगत करण्याची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांच्याकडून सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

तक्रारदार श्री.रामदास सुर्यभान खाडे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय, वरळी येथे उपोषणाला बसले नसून ते दिनांक २३.०१.२०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे उपोषणास बसले होते. त्यांनी त्यांचे उपोषण दिनांक २७.०१.२०२३ रोजी सोडले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबुर( मुंबई) येथे रेल्वे स्थानकाबाहेरील फेरिवाल्यांनी घेतलेली अनधिकृत वीज जोडणी

**(२) * ६१८६४ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबुर येथील वाय.के टेंभे ब्रिजपासून ते चेंबुर रेल्वे स्थानकापर्यंत फेरीवाल्यांनी अनधिकृतपणे वीज जोडणी रस्त्यावरुन वळवून घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनधिकृत वीज जोडणीमुळे पादचारी नागरीकांना शॉक लागून अपघात होण्याची भिती निर्माण झाल्यामुळे नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तातडीने सदर अनधिकृत वीज जोडणी काढून टाकण्यात यावी तसेच रस्त्यावरुन अनधिकृतपणे वीज जोडणी घेणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यवस्थापक, अदानी वीज पुरवठा कंपनीकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जानेवारी २०२३ मध्ये चेंबूर पुलापासून चेंबूर स्टेशन (पूर्व) पर्यंतच्या परिसरात अदानी कंपनीव्दारे अवैध विद्युत पुरवठा वापरणाऱ्या फेरीवाल्यांवर मोठया प्रमाणात छापे टाकण्यात आले. सुमारे ८० ते १०० फेरीवाल्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आणि घटनास्थळावरुन अनधिकृत विजेच्या तारा जप्त करण्यात आल्या. अदानी कंपनीने दुकानमालकांकडून फेरीवाल्यांना होणारा अनधिकृत वीज पुरवठा रोखण्यासाठी जागरुकता सत्र आयोजित केले. सामूहिक छापे टाकण्यासाठी आणि दोषींवर कारवाई करण्यासाठी पोलिसाना मदत करण्याची विनंती केली आहे. अनधिकृत विद्युत पुरवठा घेतलेल्या फेरीवाल्यांवर अदानी कंपनीने गुन्हे दाखल केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबईतील म्हाडाच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना म्हाडाने थकीत घरभाडे दंडासहित भरण्याच्या दिलेल्या नोटीसा

**(३) * ५८७६२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरगाव, वरळी, लोअर परळ येथील सुमारे २० हजार कुटुंबियांना म्हाडाने थकीत घरभाडे, दंड व करासहित, प्रत्येकी सुमारे ७० ते ८० हजार रुपयांची थकबाकी भरावी अन्यथा घर रिकामे करण्याबाबत नोटिसा बजाविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू म्हाडा इमारतींमध्ये राहणारी २० हजार कुटुंबे ही गरीब व मध्यमवर्गीय असून ही थकबाकी भरणे त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन योग्य तोडगा काढून सदर कुटुंबियांना वाढीव व थकीत भाड्यांमध्ये सवलत देण्याच्या दृष्टीने व त्यांच्याकडून पूर्वीप्रमाणे रास्त भाडे आकारण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गिरगाव, वरळी, लोअर परळ भागातील ४८३ गाळेधारकांना थकबाकी भरणेबाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.
(२) उपकरप्राप्त इमारतीच्या डागडूजीवर होणारा खर्च, मालमत्ता कर, जल आकार व सामायिक विद्युत देयक इ. साठी प्रति गाळा प्रतिमाह खर्च साधारणत: रु.२०००/- इतका आहे. सदर खर्चासाठी मार्च २०१९ पर्यंत रु.२५०/- प्रतिमाह इतके सेवाशुल्क आकारण्यात येत होते. एप्रिल २०१९ पासून यामध्ये रु.५००/- प्रतिमाह इतके सेवाशुल्क करुन प्रतिवर्ष १०% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यानुसार सद्य:स्थितीत रु.६६५.५० प्रतिमाह प्रति गाळा इतके सेवाशुल्क आकारण्यात येत आहे. सदर सेवा शुल्क प्रति गाळा प्रतिमाह होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत कमी आहे.
(३) व (४) सुधारीत सेवा शुल्क दराच्या आकारणीबाबत अथवा नोटिस बजावण्याबाबत तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.

-----------------

## आदिवासी समाजातील पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कुलगुरुंच्या राखीव निधीतुन देण्यात येणारे अनुदान बंद केल्याबाबत

**(४) * ५९१७८ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये सुमारे ७०० ते ८०० आदिवासी समाजातील संशोधक विदयार्थी विद्यावेतन नसताना स्वखर्चातून शैक्षणिक शुल्क भरून संशोधन करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील काही विद्यापीठांमधील आदिवासी समाजातील शेकडो पीएचडी करणारे विद्यार्थी कंत्राटी प्राध्यापक म्हणून तुटपुंज्या वेतनावर संशोधन कार्य करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विदयार्थ्यांसाठी कुलगुरूंच्या राखीव निधीतून पी एच डी साठी आठ हजार तर एम फिल साठी सहा हजार इतके दिले जाणारे मानधन सन २०१६ पासून बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांसाठी बंद करण्यात आलेले मानधन पुनश्च: मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२), (३) व (४) आदिवासी क्षेत्रातील सामाजिक व आर्थिक बदलांच्या प्रक्रियेचा व आदिवासी जमातीचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अनुसूचित जमातीच्या २ विद्यार्थ्यांना संशोधन अधिछात्रवृत्ती ही योजना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येत होती. सदर योजनेअंतर्गत उमेदवारांना देण्यात येणारे मानधन हे दरमहा रु. २८००/- व प्रति वर्ष सादिलवार खर्चाकरिता रु. १०,०००/- इतकी रक्कम दिनांक १५.०३.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले होते. सदर अधिछात्रवृत्ती ही केवळ आदिवासी जमातीशी संबंधित विषयांचे अनुषंगाने संशोधन करण्यासाठी देण्यात यायची, यामध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश नव्हता. त्यामुळे राज्यातील विविध आदिवासी संघटनांकडून व लोकप्रतिनिधींकडून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरिता पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी अर्थसहाय्य किंवा अधिछात्रवृत्ती देणेबाबत मागणी करण्यात येत होती. त्यास अनुसरुन आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी इतर विभागांच्या अधिछात्रवृत्ती योजनांचा अभ्यास करुन तयार केलेला प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर केलेला होता. सदर प्रस्तावास अनुसरुन दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त ५ वर्षे कालावधीसाठी दरमहा रु. ३१,०००/- संशोधन अधिछात्रवृत्ती देणे बाबतचा शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शिवडी येथील सिंधुनगर संयुक्त झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण संस्था (नियोजित) प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ५९४७७ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाच्या (एसआरए) गृहनिर्माण योजनेंतर्गत मुंबईतील ए.डी.मार्ग, रामटेकडी पथ, शिवडी येथील सिंधुनगर संयुक्त झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण संस्था (नियोजित) प्रकल्प सन १९९६ साली पुनर्विकासाकरिता विकासकामार्फत हाती घेण्यात आला असून मागील ३० वर्षांपासून सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प सुरु करण्यासाठी विकासकाडून सन २०१४ पासून टप्प्या टप्प्याने झोपड्या निष्कासित करुन भुभाग मोकळा करण्यात आला असून प्रकल्पातील पात्र झोपडीधारकांना माहे जून, २०२१ पर्यंतचे रितसर घरभाडे धनादेशाद्वारे मिळाले, परंतु माहे जुलै, २०२१ पासून आजमितीपर्यंत रहिवाशांना घरभाडे मिळालेले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प सुरु झाल्यानंतर सन २००९ साली सदर प्रकल्पाकरिता विकासकाला परिशिष्ट-२ प्राप्त झाले असतानाही आजमितीपर्यंत इमारतीच्या बाबतीत कोणतेही बांधकाम सुरु झाले नसल्यामुळे प्रकल्पातील ८१७ कुटुंबाना रस्त्यावर राहण्याची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पातील रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाच्या (एसआरए), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एम.एम.आर.डी.ए.) किंवा म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरे उपलब्ध करुन द्यावीत त्याचप्रमाणे प्रलंबित प्रकल्पाला शासनाने नव्याने आखलेल्या अभय योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी अशी मागणी प्रकल्पाच्या सभासदांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकल्पातील ८१७ कुटुंबांच्या निवासाची व्यवस्था करण्याकरिता सदर सभासदांनी केलेल्या मागणीचा विचार करुन सदर प्रकल्प शासनाच्या अभय योजनेंतर्गत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सिंधुनगर संयुक्त झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण संस्थेचे (नियोजित) विकासक मे. शेलाटकर कंस्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिनांक ०४.०६.१९९६ रोजी प्रथम आशयपत्र देण्यात आले. तथापि, विकासकाने योजनेच्या आशयपत्रातील (LOI) व मंजूर आराखडयामधील (IOA) काही अटी व शर्तींची पूर्तता न केल्याने तसेच सदर योजनेमध्ये विकासकामार्फत कोणतीही प्रगती होत नसल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१५.०६.१९९८ रोजी सदरची योजना दफ्तरी दाखल केली.

सन २००६ मध्ये विकासकाने प्रस्तुत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी नव्याने अर्ज केला. त्यास अनुसरुन सदरची योजना स्वीकारुन परिशिष्ट-२ जारी करण्यात आले. दि.१४.१२.२००९ रोजी विकासक योजनेच्या आशयपत्रातील (LOI) व मंजूर आराखडयामधील (IOA) अटी व शर्तींची अद्यापही पूर्तता करीत नसल्याने संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारित करुन विकासक मे.शेलाटकर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना बरखास्त करण्यात आले.

तदनंतर संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठरावाद्वारे (GBR) दि.१७.०१.२०१० रोजी सहायक निबंधक यांच्या समक्ष नवीन विकासक मे.सहाना प्रॉपर्टीज ॲण्ड रेसॉर्ट्स प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र अद्यापपर्यंत योजनेतील इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही.
(२) होय, हे खरे आहे.

सदर योजनेमध्ये एकूण ८१२ पैकी ७७४ पात्र सभासद असून पात्र सभासदांना जुलै, २०२१ पासून ते जानेवारी २०२३ पर्यंतचे (१८ महिन्यांचे) प्रतिमाह रु.१५,०००/- याप्रमाणे एकूण २१ कोटी (अंदाजित) भाडे थकित असल्याचे सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (झोपुप्रा) यांच्या दि.१७.०२.२०२३ रोजीच्या अहवालावरुन दिसून येते.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेत विकासकास दि.१४.०३.२००८ रोजी परिशिष्ट-२ जारी करण्यात आले होते.

सन २०१० मध्ये नवीन विकासकाची नेमणूक केल्यानंतर सन २०११ मध्ये आशयपत्र (LOI), २०१४ मध्ये पुनर्वसन इमारत क्र.१ चे मंजूर आराखडे (IOA) व २०१५ मध्ये जोत्यापर्यंतची बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तथापि, विकासकाने प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु केले नाही.

विकासकाच्या विनंती अर्जानुसार, विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली, २०३४ नुसार सदर योजना रुपांतरीत करुन एकूण ८१३ झोपडपट्टीधारकांसाठी दि.१४.१०.२०१९ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित करण्यात आले.

त्यानंतर पुनर्वसन इमारत क्र.१,२ व ३ चे सुधारित आराखडे दि.०९.०४.२०२१ रोजी जारी करण्यात आले. त्यानुसार पुनर्वसन इमारतींचे जोत्यापर्यंतचे बांधकाम प्रमाणपत्र मंजूर केले होते. तथापि, विकासकाने LOI व IOA मधील अटी व शर्तींची पूर्तता न केल्यामुळे व तिन्ही पुनर्वसन इमारतींचे जोत्यापर्यंतचे बांधकाम परवानगीसाठी (Plinth CC) भरावयाची देयक रक्कम वित्त विभाग (झोपुप्रा) यांच्याकडे अदा न केल्यामुळे सदरची Plinth CC निर्गमित करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर योजनेत विकासकाच्या दिरंगाईमुळे पुनर्वसन इमारतींचे बांधकाम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आले नाही.

(४) हे खरे नाही.

अशी मागणी प्रकल्पाच्या सभासदांकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे करण्यात आलेली नाही.

(५) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करणे व अभय योजना राबविण्यास दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी दिलेली आहे. प्रस्तुत योजनेमध्ये उक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जाफराबाद भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील सिंगल फेज ट्रान्सफार्मर नादुरुस्त झाल्याबाबत

**(६) * ५८४१३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफराबाद, भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागांत बऱ्याच ठिकाणी महावितरणचे सिंगल फेज ट्रान्सफार्मर नादुरुस्त असूनही त्यांची वेळेवर देखभाल दुरुस्ती न केल्यामुळे अनेक दिवसांपासून या परिसरात वीज खंडीत असल्याने जवळपास २०० गांवे अंधारात असल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज मीटर, ट्रान्सफॉर्मर, डीपी दुरुस्तीकरिता लागणारे सुट्टे भाग, कीटकॅट फ्यूज तार, ट्रान्सफार्मरच्या व वीज लाईनच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे फ्युज, हातमोजे, रोहित्र झाकण इत्यादी विद्युत उपकरणे महावितरणच्या वीज उपकेंद्रांत उपलब्ध नसल्याने वा उपलब्ध करून दिली जात नसल्याने या दुरुस्त्यांना अधिकच विलंब होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जाफराबाद / भोकरदन विभागीय कार्यकारी अभियंता आणि उपविभागीय सहाय्यक अभियंता / उप-अभियंता, महावितरण-महापारेषण कंपनीकडे यासंदर्भात तक्रार करूनही याची अद्याप दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

नादुरुस्त झालेले रोहित्रे महावितरणतर्फे वेळोवेळी बदलण्यात येतात. तथापि, काही अपवादात्मक परिस्थितीत नादुरुस्त रोहीत्रे बदलणे शक्य नसल्यास पर्यायी उपलब्ध असलेल्या रोहीत्रावरुन तात्पुरत्या स्वरुपात वीज पुरवठा सुरळीत केला जातो. सन २०२२-२३ मध्ये जाफराबाद व भोकरदन या उपविभागात ९४५ सिंगल फेज रोहित्रे नादुरुस्त झाले असून सर्व रोहित्रे बदलण्यात आले आहेत. महावितरण मार्फत नादुरुस्त रोहित्रे दुरुस्तीसाठी व रोहित्रे बदलण्यासाठी एजन्सीची नेमणुक करण्यात आली आहे. जालना मंडळ कार्यालयाअंतर्गत

नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करण्यासाठी एकूण ३५ एजन्सी कार्यान्वित आहेत. तसेच दुरुस्त रोहित्रे वाहतूक करुन बदलण्यासाठी २४ एजन्सी कार्यान्वित आहेत.

(२) हे खरे नाही.

दैनंदिन देखभाल व दुरुस्ती साठी लागणारे साहित्य जसे वीज मीटर, डि.पी. दुरुस्तीकरिता लागणारे सुटे भाग, कीटकॅट, फ्युज, तार, ट्रान्सफार्मरच्या व वीज लाईनच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे फ्युज, हातमोजे इत्यादी शाखा कार्यालयास आवश्यकतेनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन दिली जातात.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर पश्चिम (जि.ठाणे) डेटा हब नावाच्या कंपनीने लोकांची केलेली फसवणूक

**(७) * ६१०१४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर पश्चिम (जि.ठाणे) येथील देवधर मार्केट परिसरात डेटा हब नावाच्या कंपनीच्या कार्यालयाने वेबसाइटच्या माध्यमातून तीन दिवसात गुंतवणूक केलेली रक्कम दुप्पट करुन मिळेल अशी जाहीरात देऊन ४२ लाख २६ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बदलापूर (पूर्व) पोलिस ठाण्यात दिनांक १८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाच प्रकारे अंबरनाथ येथील फणसीपाडा परिसरातील एका महिलेची नवी मुंबईतील ऐरोली येथील एका व्यक्तिंकडून सहलीच्या (ट्रीप बुक) नावाखाली तब्बल १७ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याबाबत अंबरनाथ येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही फसवणूक प्रकरणांची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) होय हे खरे आहे.

(३) डेटा हब नावाच्या कंपनीच्या कार्यालयाने वेबसाइटच्या माध्यमातुन केलेली फसवणुकीबाबत बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात गु.र.नं २५७/२०२२ भादवि कलम ४२०,३४ प्रमाणे दि १८.१२. २०२२ रोजी दाखल आहे .सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे .

तसेच अंबरनाथ येथील फणसीपाडा परिसरातील एका महिलेची नवी मुंबईतील ऐरोली येथील एका व्यक्तीकडून सहलीच्या ( ट्रिप बुक ) नावाखाली तब्बल १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं ४३५/२०२२ भादंवि कलम ४२०, ४०६ प्रमाणे दि.१७.१२. २०२२ रोजी दाखल आहे. सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उटीपुर्णा (ता.सेनगांव, जि.हिगोली) येथील ग्रामस्थांनी काळया बाजारात जाणारे रेशनचे धान्य पकडल्याबाबत**

**(८) * ६०८३४ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उटीपुर्णा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील ग्रामस्थांनी काळयाबाजारात जाणारे रेशनचे धान्य पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले असल्याची बाब माहे जानेवारी २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रेशन दुकानदारासह अन्य दोघांविरोधात सेनगाव पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी रेशन दुकानदारासह अन्य दोघांविरोधात सेनगाव पोलीस स्टेशन, जि.हिंगोली येथे जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गु.र.नं. ३४/२०२३ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

प्रकरणी गुन्ह्यातील तीनही आरोपींना अटक करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सातारा भोसले (ता.पोंभूर्णा, जि.चंद्रपूर)येथील ग्रामपंचायतीत आर.ओ. प्लांट साहित्य खरेदीत पुरवठा धारकाने बोगस वस्तु व सेवाकर क्रमांक जोडून केलेला गैरव्यवहार**

**(९) * ५९७९५ श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सातारा भोसले येथील ग्रामपंचायतीत आर.ओ.प्लांट साहित्य खरेदीत पुरवठा धारकाने बोगस वस्तु व सेवाकर क्रमांक जोडून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) सदर प्रकरणाच्या चौकशीमध्ये जिवन निरा शितल जल निविदेवरील जीएसटी क्रमांक चुकीचा आढळून आला आहे.
(२) ग्रामपंचायत दर पत्रके / ई निविदेत सहभाग घेण्यापासून २ वर्षांसाठी बंदी का घालण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत कंत्राटदारास नोटीस बजाविण्यात आलेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंधेरी (पूर्व ) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये मोठया प्रमाणात झालेली घुसखोरी**

**(१०) * ६०८७१ श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये मोठया प्रमाणात घुसखोरी झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीमध्ये पात्र झोपडीधारकांना सदनिका अद्याप वितरित झालेल्या नसून जे या योजनेमध्ये अपात्र आहेत अशा लोकांनी या इमारतीमधील सदनिकेमध्ये घुसखोरी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलिसांकडून याबाबत कारवाई करण्यास टाळाटाळ होत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन सदर घुसखोरांना तात्काळ बाहेर काढण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी घुसखोरीबाबत मऔवि महामंडळामार्फत एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अंधेरी येथे दि.१३/०२/२०२० रोजी FIR क्र. ७५/२० दाखल करण्यात आला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
पॉकेट क्र. ५ मधील इमारत क्र. १ व २ तसेच पॉकेट क्र.३ च्या इमारत क्र.५ मध्ये पात्र झोपडीधारकांना सोडत पध्दतीने सदनिकांचे वाटप करण्यात आलेले आहे. तर, इमारतीतील उर्वरित सोडतीकरीता प्रस्तावित असलेल्या सदनिकांमध्ये अपात्र झोपडीधारकांची घुसखोरी झाली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी घुसखोरीबाबत मऔवि महामंडळामार्फत एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अंधेरी येथे ६९ व्यक्तींविरोधात विकासकामार्फत दि.२८/०५/२०१९ रोजी रितसर तक्रार दाखल करण्यात आली आहे.
तसेच ९९ व्यक्तींविरोधात दि. १३/०२/२०२० रोजी मऔवि महामंडळामार्फत FIR क्र. ७५/२० दाखल करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने मऔवि महामंडळामार्फत दाखल केलेल्या FIR क्र. ७५/२० बाबत विकासका विरोधात पुरावा निष्पन झाल्याने एमआयडीसी पोलीस ठाणे, अंधेरी यांनी मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र क्र. १२७०/पी. डब्ल्यू/२०२२, दि. २७/०५/२०२२ रोजी दाखल करण्यात आले आहे.

(४) मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकासकाने केलेल्या अनियमिततेबाबत महामंडळाच्या स्तरावर वरिष्ठ पातळीवर वेळोवेळी बैठका घेऊन विकासकाने केलेल्या अनियमितता सुधारण्यासाठी मुदत देण्यात आली होती. तथापि, बैठकीत ठरल्याप्रमाणे विकासकाने कोणतीही कामे विहीत मुदतीत पुर्ण केली नाहीत. ही बाब महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तरपणे सादर करण्यात आली.

सदर प्रस्तावास दि. २७/१२/२०२२ रोजीच्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठक क्र. ३९४ मधील मंजूर ठराव क्र. ६४९० नुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने विकासकाने परस्पर वाटप केलेल्या सदनिकांचे सर्वेक्षण करतेवेळी Video चित्रीकरणाद्वारे घुसखोरी झालेल्या सदनिकांचे पुनश्च: सर्वेक्षण करुन, घुसखोरांना नोटीस बजावून त्याची प्रत विकासकास कार्यवाहीकरीता देऊन घुसखोरी झालेल्या सदनिका पोलिस सुरक्षेसह विकासकामार्फत रिक्त करणे याकरीता विकासकास ०३ महिन्यांच्या कालावधी देणे व विकासक या कालावधीत घुसखोर काढण्यास असमर्थ ठरल्यास ०३ महिन्यांनंतर विकासक व घुसखोर यांच्यावर FIR दाखल करण्यात येईल, या सर्व बाबींचा समावेश करुन विकासकास दि. ३०/०१/२०२३ रोजी मऔवि महामंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

तदनंतर विहीत केलेल्या कालावधीत विकासक कार्यवाही करण्यास असमर्थ ठरल्यास, या योजनेत बांधकामा मधील असलेल्या व सोडतीकरीता उपलब्ध असलेल्या सदनिकांमधील घुसखोरी प्रतिबंधीत करण्यासाठी मऔवि महामंडळामार्फत सुरक्षा रक्षक तैनात करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच याबाबतची पुढील सर्व यथोचित कार्यवाही मऔवि महामंडळामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयात विविध बोगस फायनान्स कंपन्यानी केलेली फसवणूक

**(११) * ५९०७३ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात मागील काही कालावधीपासून विविध बोगस फायनान्स कंपन्यांनी दामदुप्पट, परदेशी सफर आणि बक्षिसांची अमिषे दाखवून सुमारे ४०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रारी नोंदवूनही पोलीसांकडून अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधित बोगस फायनान्स कंपन्या तसेच या प्रकरणांमध्ये कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी बाब नुकतीच निदर्शनास आली नाही. तथापि, सांगली जिल्ह्यामध्ये विविध फायनान्स कंपन्यांनी गुंतवणुकदारांकडून विविध योजनांद्वारे स्वीकारलेल्या ठेवी व रकमांवर दिलेल्या हमीप्रमाणे पूर्ण परतावा न देता फसवणूकीच्या बाबी घडल्या आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी माहे जानेवारी २०२१ ते जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये सांगली जिल्ह्यात एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर दाखल गुन्ह्यांमध्ये एकूण २६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी ०८ गुन्ह्यांमधील एकूण २१ आरोपीं विरोधात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आली आहेत. उर्वरित प्रकरणी तपास सुरु आहे.

तसेच अशा प्रकरणी ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ४ अन्वये संबंधित वित्तीय संस्था तसेच संस्थेचे अध्यक्ष / संचालक व इतर यांनी अपहार केलेल्या रकमेतून खरेदी केलेली स्थावर-जंगम मालमत्ता व ठेव रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धारतळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) महाविद्यालयात शिकणाऱ्या दोन तरुणींवर झालेला प्राणघातक हल्ला**

**(१२) * ५९०३६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारतळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) महाविद्यालयात शिकणाऱ्या भालावली येथील कु.रिध्दी गुरव व कु.साक्षी गुरव या दोन तरुणींवर आरोपी विनायक शंकर गुरव यांने दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्राणघातक हल्ला केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हल्ल्यात कु.साक्षी गुरव हिचा मृत्यू झाला असून कु.सिध्दी गुरव गंभीररित्या जखमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी चौकशी करुन दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) पोलीस ठाणे नाटे (जि. रत्नागिरी) येथे गु. र. नं. ०४/२०२३ भा. दं. वि. कलम ३०२, ३२६, २०१, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावातील दोन गटाच्या वादातून आरोपीने फिर्यादीच्या गटातील लोकांवर राग धरुन सदरचा हल्ला केला असल्याचे आतापर्यंतच्या तपासावरुन दिसून येत असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यात युरिया खताचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(१३) * ६१४४० श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात युरिया खताचा काळाबाजार होत असून भिवंडी पोलिसांनी युरियाचा १०० टन साठा जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील विक्रमगड, डहाणू, वाणगाव, चिंचणी, सफाळे, बोईसर, धुंदलवाडी, तलासरी, कासा, केळवे, कुडूस, खाणिवली, कँचाड, पाचमाड, मलवाडा, तलावाडा, मोखाडा, खोडाळा, जामसर, सायवण, आशागड आणि वाडा येथील कृषी सेवा केंद्रांच्या नावाने खरेदी केलेला हजारो टन अनुदानित निमकोटेड युरिया प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वाटप न होता गोदामांमध्ये त्याच्या पॅकिंग बदलून तारापूर औद्योगिक वसाहतीमधील काही टेक्सटाईल्स, केमिकल आणि फार्मा उद्योगांना बेकायदेशीररित्या पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पूर्णा गाव ता.भिवंडी येथे निमकोटेड युरियाचे साठवणुक केल्या प्रकरणी १०० टन साठा जप्त करुन नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे दि. १७/०१/२०२३ रोजी गु.रं.क्र.८४/२०२३, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ व खत नियंत्रण आदेश १९८५ मधील खंड २५ (१), (२), (३) व अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा निमकोटेड युरियाचा माल कोणत्या कृषीसेवा केंद्रातून आणला आहे. तसेच सदर मालाचा पुरवठा कोठे करण्यात येणार होता याबाबत अधिकचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धायरी (जि.पुणे) येथे एका विवाहितेवर अंधश्रध्देतुन अघोरी प्रकार केल्याबाबत

**(१४) * ५८४५७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धायरी (जि.पुणे) येथे एका विवाहितेला व्यवसायाची भरभराट आणि मूलबाळ व्हावे या कारणातून अघोरी पूजा करून त्यात माणसाची व प्राण्यांच्या हाडांची भुकटी जबरदस्तीने खाण्यास भाग पाडल्याचा अघोरी प्रकार दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकार याअगोदर विवाहितेच्या सासरी दिनांक २७ एप्रिल २०१९ रोजी वा त्यासुमारास सुरू होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सिंहगड पोलीस ठाण्यात संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली तसेच अशा अघोरी प्रकारांना आळा घालण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी सिंहगड रोड पोलिस स्टेशन जि. पुणे गु.र.नं. ४३/२०२३ भादवि कलम ४९८(अ) , ३२३, ५०४, ५०६(२), ३४ सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे दि.१८.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कनेरसर (ता.खेड, जि.पुणे) येथील पोलीस पाटील**
**गैरप्रकारांना प्रोत्साहन देत असल्याबाबत**

**(१५) * ५८९०३ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनेरसर (ता.खेड, जि.पुणे) येथील पोलीस पाटील हे जुगार व अवैध दारु विक्रीचा धंदा करणाऱ्यांना पाठीशी घालून वृद्धांना त्रास देत असून अतिक्रमण करत असल्याचे गैरप्रकार करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचे विरोधात उपविभागीय अधिकारी, प्रांत व तत्कालीन पोलीस निरीक्षक यांनी कारवाई करण्याबाबतचे निवेदन महसूल मंत्री यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी (प्रांत), खेड यांनी पोलीस निरीक्षक, खेड यांना दिनांक १६ डिसेंबर, २०२२ रोजी चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्राय पाठविण्याबाबत पत्र दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सबंधित दोषी पोलीस पाटील यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, खेड यांनी सदर प्रकरणी चौकशी केली असून दि. १५/११/२०२२ रोजीचा तक्रार अर्ज दि. २५/०१/२०२३ रोजी निकाली काढला असून त्याबाबत तक्रारदारास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ज्ञानदिप गुरुकुल (जि.नाशिक) येथील आधारश्रमात**
**मुलींवर होत असलेल्या लैंगिक अत्याचाराबाबत**

**(१६) * ५९८४३ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ रोड परिसरातील म्हसरुळ शिवारातील ज्ञानदिप गुरुकुल (जि.नाशिक) आधाराश्रमात वास्तव्यास असणा-या इयत्ता ९ वीच्या विद्यार्थीनीवर आश्रमाच्या संचालककाकडून लैंगिक अत्याचार होत असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतरही विद्यार्थीनीवर अशाच प्रकारचे लैंगिक अत्याचार सदर संचालककाकडून होत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आश्रमातील लाभार्थी व तेथील व्यवस्था याबाबत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी दरमहा आश्रमास जावून तपासणी केलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घटनेत लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण आणि अनुसूचित जाती-जमाती कायद्याचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. सदर घटनेच्या अनुषंगाने सटाणा पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे दिनांक २७.११.२०२२ रोजी गु. र. क्र. ४६०/२०२२ भादंवि कलम ३७६ (२)(एफ)(सी)(एन), ३५४, ३५४ (अ) सह पॉक्सो कायदा २०१२ चे कलम ४,६,८,१० व १२ सह बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ७५ तसेच अ.जा.ज.अ.प्रति. अधिनियम, १९८९ चे सुधारीत अधि.२०१५ चे कलम ३ (१)(आय)(आय आय),३(२)(५-अ),३(२)(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, म्हसरुळ पोलीस ठाणे, नाशिक आयुक्तालय येथे गु. र. क्र. २०३/२०२२, २०६/२०२२, २०७/२०२२, २०८/२०२२, २०९/२०२२, २११/२०२२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) सदर आश्रम बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५ अंतर्गत नोंदणीकृत नसल्याने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडून तपासणी करण्यात येत नाही.
(४) होय.
(५) आरोपी संचालक यास अटक करण्यात आली असून सदर आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा यांचेकडे महावितरण वीज कंपनीची असलेली थकबाकी

**(१७) * ६०११८ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह सर्व महापालिका वगळता राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायतीचे पथदिवे, सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजनांसाठी लागणाऱ्या वीजपुरवठा देयकांची थकबाकी सुमारे १३ हजार कोटींच्या जवळपास असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकबाकीची रक्कम देऊन महावितरणला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईसह सर्व महापालिका वगळता माहे जानेवारी २०२३ अखेर राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती यांची पथदिव्यांची थकबाकी रुपये ३१७.८९ कोटी व सार्वजनिक पाणीपुरवठा यांची थकबाकी रुपये ३२२.४० कोटी व ग्रामीण विकास विभागाची (ग्रामपंचायत, पंचायतसमिती व जिल्हापरिषद) माहे

जानेवारी २०२३ अखेर पथदिव्यांची थकबाकी रुपये ५९१३.१९ कोटी व सार्वजनिक पाणीपुरवठा यांची थकबाकी रुपये २२९१.८२ कोटी अशी नगरपरिषद, नगरपालिका व नगरपंचायत आणि ग्रामीण विकास विभागाची एकूण थकबाकी रुपये ८८४५.८३ कोटी आहे.

(२) ग्रामविकास विभागाकडील सर्व जिल्हापरिषद, ग्रामपंचायती व नगर विकास अखत्यारितील "क" वर्ग नगरपरिषद व नगरपंचायती यांच्या कडील सार्वजनिक पाणीपुरवठा व पथदिव्यांची दि.३०.०६.२०२२ रोजी पर्यंत वीज देयकांच्या थकबाकी वसूली करिता One Time Settlement (OTS) योजना दि.०९.०१.२०२३ रोजीच्या शासन निणर्यान्वये मंजूर करण्यात आली आहे. ज्या अंतर्गत दि. ३०.०६.२०२२ अखेर असणाऱ्या एकूण थकबाकी रक्कमेवरील व्याज व दंड माफ करण्यात आला आहे.

ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांच्या विद्युत देयकांची थकबाकी भागविण्याकरिता रु.२२१४.७३ कोटी इतकी पुरवणी मागणी विधीमंडळास सादर केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर येथील `बहुद्देशीय केंद्र' विनावापर पडून असल्याबाबत

**(१८) * ५८०१६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर, मुंबई येथील रमाबाई आंबेडकर नगर मधील नागरिकांसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांनी सुमारे रु. ५.७१ कोटी खर्च करून "बहुद्देशीय केंद्र" बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या `बहुद्देशीय केंद्रात' कोणत्याही मूलभूत सोयी-सुविधा तसेच या प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने हे बहुद्देशीय केंद्र मागील ५ वर्षांपेक्षा अधिककाळ वापराविना पडून असल्याचे लेखापरिक्षण अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बहुद्देशीय केंद्रास भोगवटा प्रमाणपत्र देऊन ते सुरु करण्याबाबत तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

म्हाडाचा घटक मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत बहुउद्देशीय केंद्राचे बांधकाम करण्यात आले असून, सदर बांधकाम सन २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. त्यासाठी रु. ६.८० कोटी रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या I.O.D. मधील अट क्र. ४ व ५ नुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यात करारनामा न झाल्याने, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. तथापि, स्थानिक रहिवाशी या बहुउद्देशीय केंद्राचा वापर करीत असल्याचे दिसून येते.

भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माटेगाव (ता.कळंब, जि.यवतमाळ) परिसरातील बेबंळा कालव्याच्या वितरीकेचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१९) * ६१३४० डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटेगाव (ता.कळंब, जि.यवतमाळ) परिसरातील बेंबळा कालव्याच्या आष्टा वितरीकेचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने माटेगांव शिवार शेत सर्व्हे क्र. १०३ मध्ये कालव्याचे पाणी शिरुन शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कालव्याला पाणी सोडल्यास माटेगाव येथील कालव्याच्या बाजुने शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन नुकसान होत असल्याची तक्रार श्री.जगताप यांनी संबंधित विभागाकडे वारंवार करुनही वितरीका दुरुस्त करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कालवा दुरुस्ती तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

श्री.जगताप यांची तक्रार दिनांक २० जानेवारी २०२० पूर्वीची असून त्या ठिकाणी वितरीकेच्या खोदकामात Fissured Rock (तडे पडलेला खडक) लागलेला होता व त्यातुन सर्वे क्र.१०३ मध्ये पाणी झिरपुन जात होते. परंतु सद्य:स्थितीत तिथे CONCRETE LINING चे काम करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर वितरीकेच्या सा.क्र.११०० ते १२८० व १७७५ ते १९०५ मी. पर्यंत काम पुर्ण झालेले आहे.
(३) कालवा दुरुस्त करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आवापूर (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) परिसरात असलेल्या अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या कृत्रिम तलावात तीन बालकांचा झालेला मृत्यु**

**(२०) * ६१७९९ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आवापूर (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) परिसरात असलेल्या अल्ट्राटेक सिमेंट कपनीच्या वसाहतीलगत विद्युतनिर्मिती प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशव्दाराला लागून कृत्रिम तलाव निर्माण करण्यात आलेला असून या तलावात दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास कु.पारस सचिन गोवारदिपे, कु.दर्शन शंकर बच्चाशंकर व कु.अर्जुन सुनील सिंग या तीन १० वर्षीय बालकांचा बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनी प्रशासनाने स्वत:साठी अशा प्रकारच्या अनेक कृत्रिम तलावांची निर्मिती केली असून तेथे कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळेच या तीन बालकांचा नाहक बळी गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) चंद्रपूर जिल्हयातील कोरपना तालुक्यातील आवापूर परिसरात असलेल्या अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने फक्त एकाच ठिकाणी कृत्रिम तलावाची निर्मिती केली होती व सदर दुर्घटना घडल्यानंतर कंपनीने कृत्रिम तलाव तात्काळ बुजविला आहे. तसेच, सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस ठाणे, गडचांदूर (जि. चंद्रपूर) येथे अकस्मात मृत्यु क्र.०७/२०२३, क्र.०८/२०२३ व क्र.०९/२०२३ फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ च्या कलम १७४ अन्वये नोंद करण्यात आलेली आहे. प्रकरणी पुढील चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील श्री ज्योतिबा देवस्थानची शेकडो एकर जमीन परस्पर विकल्याबाबत

**(२१) * ५८६९३ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील श्री ज्योतिबा देवस्थानची शेकडो एकर जमीन परस्पर विकल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवस्थान व्यवस्थापन समितीच्या वतीने देवस्थानाची जमीन खाजगी कंपनीच्याद्वारे मोजणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर, धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सह दुय्यम निबंधक वर्ग १ व वर्ग २ यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या नोंदवहीत श्री केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी के.ए.२८४६ कोल्हापूर (श्री जोतिबा) या न्यासाच्या जमिनीच्या विक्रीची नोंद झाल्याचे आढळून आले नाही, असे नमूद केले आहे.

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर या समितीच्या अधिनस्त असलेल्या सर्व देवस्थानाच्या जमिनीचा शोध घेऊन नोंद करणेकरीता SAAR IT RESOURCES PVT. LTD. या कंपनीला नियुक्त करण्यात आले आहे. जमिन सर्व्हेचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण कंपनीने विजेच्या दरवाढीची मागणी करणारी याचिका विदयुत नियामक आयोगाकडे दाखल केल्याबाबत**

**(२२) * ५६५३५ श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण कंपनीने विजेच्या दरवाढीची मागणी करणारी याचिका विदयुत नियामक आयोगाकडे दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नागरिकांकडून ऑनलाईन हरकती व सूचना मागविल्या असून जनसुनावणीसुध्दा ऑनलाईन प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वीज गळती, वीज चोरी, थकबाकी वसुली, वाढीव व अवाजवी खर्च इत्यादी अनेक कारणे आर्थिक असमतोलासाठी कारणीभूत असताना वीज दरवाढीच्या माध्यमातून हा भूर्दंड नागरिकांवर टाकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील दरवाढ मंजूर झाल्यास वीज ग्राहकांवर रु. १.३५ प्रति युनिट इतका अतिरिक्त आर्थिक भार नागरिकांना सहन करावा लागणार असून घरगुती, औद्योगिक, शेती, पर्यटन, शैक्षणिक इत्यादी सर्व बाबींवर या दरवाढीचा परिणाम होणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन राज्यातील वीज दरवाढ रोखण्याबाबत तसेच दिल्ली व इतर राज्यांच्या धर्तीवर वीज ग्राहकांना अधिकची सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण या कंपन्यांनी बहुवर्षीय वीजदर विनियम, २०१९ मधील तरतूदीनुसार सन २०१९-२० ते सन २०२२-२३ साठी महसूलाचे अचूक समायोजन करण्यासाठी तसेच सन २०२३-२४ ते सन २०२४-२५ या कालावधीसाठी सुधारित वीजदर ठरविण्यासाठी मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे मध्यावधी आढावा याचिका सादर केलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाव्दारे ऑनलाईन पध्दतीने जाहीर सुनावणी घेऊन प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

(३) व (४) सदर याचिका सध्या मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर न्यायप्रविष्ट आहेत. अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

(५) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने याबाबत निर्णय दिलेला नसता तरी  सद्यस्थितीत राज्य शासनाव्दारे विविध धोरणांतर्गत कृषी, यंत्रमाग, वस्त्रोद्योग तसेच विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील पात्र ग्राहकांना वीजदरात सवलत देण्यात येत आहे. सदर ग्राहकांना वार्षिक सुमारे रु.८८०० कोटी इतकी सवलत शासनामार्फत देण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिंवडी (जि.ठाणे) येथील नंदिठणे गावातील मुळ शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारी रक्कम परस्पर काढून केलेला गैरव्यवहार**

**(२३)** * **६०८६२  श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :**   सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) येथील नंदिठणे गावातील मुळ शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारी ११ कोटी ६६ लाख ६४ हजार रूपयांची रक्कम उप विभागीय अधिकारी यांनी परस्पर काढून घेऊन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी एसआयटी समिती गठीत करून चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस निरीक्षक, कोकण विभाग व  पोलीस आयुक्त, ठाणे यांना दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी ई-मेल द्वारे निवेदन पाठवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महिला आरोपींनी उप विभागीय अधिकारी यांनी कसे व कोणत्या ठिकाणी पैसे घेतले हे जबाबात लिहून दिलेले असताना देखील संबंधित पोलीस तपास अधिकारी यांच्याकडून सबंधित अधिकाऱ्यांना आतापर्यंत एकदाही चौकशीकरिता बोलविण्यात आलेले नसून त्यांचा विरोधात कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून गेलेला असताना देखील अद्याप याबाबत चार्जशीट दाखल करण्यात आली नसल्याने ११ कोटी ६६ लाख ६४ हजार इतक्या रकमेची वसूली देखील अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणात शासनाची फसवणुक करून शासनाच्या पैशांचा अपहार केले बाबत अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, भिवंडी, जि. ठाणे यांचे तक्रारीवरुन शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे दि.२५/०४/२०२२ रोजी गु.र.क्र. २३२/२०२२ भा.दं.वि. कलम ४०९, ४०६, ४२०, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७९, १२० (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी यांच्या स्तरावर वेगवेगळी पथके तयार करून, तपास करण्यात येत असून बनावट शेतकऱ्यांचे नांवे संपादित जमीनीचा मोबदला वर्ग होणेकरीता आरोपीतांचे कटात सहभागी असलेले उपविभागीय अधिकारी कार्यालय, भिवंडी येथे नेमणुकीत असलेले तत्कालीन नायब तहसीलदार सह इतर असे एकूण १९ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. तसेच  उपविभागीय अधिकारी कार्यालय, भिवंडी, येथे नेमणूकीत असलेले तत्कालीन उपविभागीय अधिकारी तसेच अन्य कर्मचारी यांचेकडे गुन्हयाचे संदर्भात सखोल विचारपुस करून त्यांचे जबाब नोंद करण्यात आलेले आहेत.

(३) व (४) सदर गुन्हयाची व्याप्ती मोठया प्रमाणात असून सदर गुन्ह्यात निष्पन्न झालेली आरोपीतांची बँक खाती गोठविण्यात आली असून इतर मालमत्ता जप्त करण्यात आली असून गुन्हा तपासाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड तालुक्यातील ( जि.रत्नागिरी ) जगबुडी व चोरटी या दोन्ही नदयांमध्ये मोठया प्रमाणात गाळ साचल्याबाबत**

**(२४) * ५८०२८ श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जगबुडी नदी व चोरटी नदी या दोन्ही नद्यांमध्ये मोठया प्रमाणात गाळ साचल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही नद्यांमध्ये गाळ साचल्यामुळे पावसाळयात अनेक वेळा नदीचा प्रवाह बदलून नदीचे पाणी वाडया वस्त्यांमध्ये शिरुन धोका निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोन्ही नद्यांमधील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

खेड तालुका, जि.रत्नागिरी मधील जगबुडी व चोरटी या दोन्ही नद्यांमध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचला असून त्यामुळे नदी प्रवाहाला अडथळे निर्माण झाले आहेत. सदर गाळाची पाहणी करुन गाळाच्या परीमाणाचा अहवाल कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग, रत्नागिरी कार्यालयाने त्यांचे दिनांक १९.०५.२०२२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सादर केला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

जुलै, २०२१ च्या पूर परिस्थितीमध्ये काही ठिकाणी हे निदर्शनास आले आहे.
(३) रत्नागिरी जिल्हयातील नैसर्गिक आपत्ती व पूर परिस्थितीच्या दृष्टीने उपाययोजना करणेसाठी नद्यांमधील गाळ काढणे विषयी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती निवारण प्राधिकरण, रत्नागिरी यांनी दिनांक १५.१२.२०२२ रोजीच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये जगबुडी, नारंगी, कुंभार्ली, डूबी व चोरद या नदींतील अंदाजित १२.८९ लक्ष घ.मी. गाळाच्या परिमाणापैकी जगबुडी व नारंगी नदीतील ३.५० लक्ष घ.मी. गाळ उपसा करणेसाठी परवानगी दिली आहे.
जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांचेमार्फत दिनांक ०९.०२.२०२३ रोजी जगबुडी नदीतील गाळ काढण्याच्या कामास रुपये २४.०३ लक्ष रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विकासनगर कोतवाली पोलीस ठाणे (जि.परभणी) येथुन अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याबाबत**

**(२५) * ६१३९१ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकासनगर कोतवाली पोलीस ठाणे (परभणी) येथील एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे अमिष दाखवून पळवून नेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात या मुलीच्या आईने कोतवाली पोलीस ठाणे येथे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी तक्रार नोंद केली असतानाही त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या गुन्हयातील दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

प्रकरणी मुलीच्या आईच्या फिर्यादीवरुन दिनांक १३.१०.२०२२ रोजी पोलीस स्टेशन कोतवाली येथे गु.र.नं. २९७/२०२२ भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर अल्पवयीन मुलीचा शोध सुरु असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळवट (ता.खेड, जि.रत्नागिरी) लघुपाटबंधारे प्रकल्पाची**
**संरक्षक भिंत वाहून गेल्याबाबत**

**(२६) * ५८९०० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळवट (ता. खेड, जि.रत्नागिरी) लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या बौध्दवाडीजवळील प्रकल्पाच्या संरक्षक भिंती माहे जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये वाहून गेल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संरक्षक भिंती वाहून गेल्यामुळे बौध्दवाडीकडे जाणारा पूल खचला आहे तसेच धरणाच्या वरील बाजूस असलेला जलाशय काटरस्ता (रिंगरोड) वाहून गेल्याने नागरिक व विद्यार्थ्यांच्या येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपरोक्त कामांना खास बाब म्हणून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. खरे आहे.
(२) होय. खरे आहे.
(३) अंशतः खरे आहे.

दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ रोजीचे पत्र अद्याप या विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपरोक्त कामांना खास बाब म्हणून मान्यता देऊन कामे पूर्ण करण्याबाबत संबंधितांस आदेश व्हावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१६ऑगस्ट, २०२२ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.
(४) जलाशयाचा काटरस्ता (रिंगरोड) यांत्रिकी विभाग, अलोरे यांचेमार्फत मशीनद्वारे भराव करून पूर्ववत करण्यात आलेला आहे. काटरस्त्याच्या खडीकरणाचे काम सुप्रमा मान्यतेनंतर हाती घेण्याचे नियोजित आहे.

पुरामुळे क्षतिग्रस्त झालेल्या संरक्षक भिंतीच्या दुरूस्तीचा समावेश सुप्रमामध्ये करणेत आला असून सुप्रमा अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केल्यानंतर संरक्षक भिंतीचे कामे हाती घेण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. बौध्दवाडीकडे जाणारा पूल जिल्हा परिषदेअंतर्गत असल्याने सदर कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाकुर्ली (जि.ठाणे) रेल्वे परिसरात अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार

**(२७)** * **६०६७६ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाकुर्ली (जि.ठाणे) रेल्वे परिसरात सतरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर पोलीस असल्याचे सांगून २५ ते ३० वयोगटातील तरुणांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीडितेच्या तक्रारीवरून विष्णूनगर पोलीस ठाण्यात लैंगिक अत्याचार, बाल लैंगिक अत्याचार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेल्वे परिसरात गर्दुल्ल्यांचा वावर वाढला असून स्थानक परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटनेतील आरोपी यांनी पोलीस असल्याचे भासवून व धमकी देऊन दि.२७.०१.२०२३ रोजी कृत्य केले.

(२) पिडीतेच्या तक्रारीवरुन विष्णुनगर पोलिस ठाणे, जि. ठाणे येथे गु. र. क्र. ४१/२०२३ कलम ३७६ (ड), ५०६ भा.दं.वि. स.सह पोक्सो कायदा कलम ४, ८, १२ व आय टी ॲक्टच्या कलम ६६ ई अन्वये दि. २८.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण ०२ आरोपीस अटक करण्यात आलेली असून सदर प्रकरण तपासाधीन आहे.

(३) स्थानिक परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून केलेली नाही.

(४) ठाकुर्ली रेल्वे स्टेशन परिसरात दिवसा व रात्रौ पोलीस गस्त, मोबाईल गस्त घालण्यात येते. लोहमार्ग पोलीसांतर्फे फलाट गस्त पथक, गुन्हे प्रतिबंध पथक, सुरक्षा पथक, रॉबरी पॉईंट व ड्रॉपिंग पॉईंट अशी पथके दिवसा व रात्रौ नियुक्त करण्यात येत आहेत. रेल्वे परिसरात सीसीटीव्ही बसवण्यात आले असून अनधिकृत प्रवेशद्वार बंद करण्यात येत आहेत. तक्रारदारासाठी दुरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शांतीनगर, भिवंडी (जि.ठाणे) येथे बालिकेवर झालेला लैगिंक अत्याचार

**(२८) * ६०५४० श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शांतीनगर, भिवंडी (जि.ठाणे) येथील एका तीन वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबणाचे कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सदरची घटना दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी घडली.
(२) दिनांक २५.०१.२०२३ रोजी शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी येथे गु.र.क्र.६५/२०२३ भादंवि कलम ३६३, ३०२, ३६६(अ), ३७६, ३७६(अ)(ब), ३७६(जे),३७७ सह पॉक्सो कलम ४,६,८,९ (एम), १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्हयातील आरोपीची ओळख निष्पन्न करण्यात झाली असून त्याचा शोध घेण्यात येत असुन पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरोरा-वर्धा टॉवर लाईनच्या कामात महापारेषण अधिकाऱ्यांनी भूमिहिनांना शेतकरी दाखवून केलेला गैरव्यवहार

**(२९) * ६११९८ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोऱ्यापासून वर्ध्यापर्यंत २२० किलो व्हॅटच्या लाईन क्रमांक-२ च्या अतिउच्चदाब टॉवर लाइनची पायाभरणी व तारा ओढण्याच्या कामात शेतकऱ्यांच्या नावाने बोगस सातबारा जोडून महापारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टॉवरलाईनच्या कामात भूमिहिनांना शेतकरी दाखवून तर काही शेतकऱ्यांच्या शेतातून टॉवर लाइन गेली नसताना त्यांना बाधित दाखविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील टॉवर लाइनमुळे १५ गावातील २६४ शेतकरी बाधित झाले असून यातील अनेक शेतकऱ्यांना अद्यापही योग्य मोबदला न मिळाल्यामुळे त्यांनी या कामास विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सर्व बाधीत व पात्र अशा २५१ शेतकऱ्यांना/ जमीन मालकांना नियमानुसार देय मोबदला देण्यात आला आहे. तथापि, त्यातील काही शेतकऱ्यांनी/ जमीन मालकांनी उप विभागीय अधिकारी, वरोरा यांच्या न्यायालयात जमीनीच्या व पीक नुकसान भरपाईच्या मोबदल्या संदर्भात प्रकरण दाखल केले होते. त्याबाबत, उप विभागीय अधिकारी, वरोरा यांनी दि. ०५.०९.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाविरुध्द महापारेषण कंपनीने मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे W.P. No. : ५८९७ of २०२२ अन्वये दाद मागितली असून सदर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी अंतरिम स्थगन आदेश दि. २२.०९.२०२२ रोजी पारित केला आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरु असून मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात राख वाहून नेण्यासाठी कास्ट बेसाल्ट पाईपची खरेदी मूळ किंमतीपेक्षा अधिक दराने केल्याबाबत

**(३०) * ५९७४६ श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महानिर्मितीच्या चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात राख वाहून नेणारा ‘कास्ट बेसाल्ट’ पाईप शेजारच्या गुजरात राज्यापेक्षा तिप्पट दराने खरेदी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही खरेदी पुणे येथील एका विशिष्ट कंपनीकडूनच व्हावी यासाठी या कंपनीला पूरक ठरतील अशा अटी निविदेत समाविष्ट करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. (महानिर्मिती) व्दारे, नमूद केलेल्या कालावधीमध्ये कास्ट बेसाल्ट पाईपची खरेदी, चंद्रपूर अथवा अन्य कोणत्याही औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रासाठी करण्यात आलेली नाही.

मात्र, चंद्रपूर औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात राख वाहून नेण्यासाठी कास्ट बेसाल्ट पाईपची आवश्यकता असल्याने, सदर पाईप खुल्या निविदेव्दारे खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

कोविड-१९ मुळे उद्योगधंद्यांवर झालेल्या विपरीत परिणामुळे सदर निविदेत जास्तीत जास्त पुरवठादारांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने आणि स्पर्धात्मक खरेदीसाठी, निवेदेचे पूर्व-अर्हता निकष, मालमत्तेच्या गुणवत्तेवर कोणताही परिणाम होणार नाही याची काळजी घेवून, उचितरित्या शिथिल करण्यात आले आहे.

तसेच पूर्व-अर्हता निकषांमध्ये कोणत्याही नवीन अटी वा शर्ती यांचा समावेश करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तसेच विदर्भातील शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी दिवसा १२ तास वीज उपलब्ध करून देण्याबाबत

**(३१) * ५८३६७ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी दिवसा १२ तास थ्री फेज वरून वीज देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपनीकडून यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयातून अमरावती जिल्ह्याला वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना कृषि पंपासाठी दिवसा १२ तास थ्री फेजवरुन वीज पुरवठा करणेबाबत तसेच हा निर्णय अमरावती जिल्ह्याला देखील लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) वीज भार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषीपंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात कृषीवाहिन्यावरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येतो. त्यानुसार सद्यस्थितीत संपूर्ण राज्यात एकूण कृषी भारापैकी सर्वसाधारणपणे ५० % भार असलेल्या कृषीवाहिन्यावर दिवसा ८ तास व उर्वरित सुमारे ५०% भार असलेल्या कृषीवाहिन्यावर रात्री ८ तास अशी वीजेची उपलब्धता चक्राकर पध्दतीने देण्यात येत आहे.

(४) शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा देणे हे मुख्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून "अटल सौर कृषी पंप योजना-१ व २" व "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना" व "उच्चदाब वितरण प्रणाली योजना" अंतर्गत १,१३,६१६ पंप आस्थापित करण्यात आले असून "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना" अंतर्गत महावितरण कंपनीने १५०९ मे.वॅटचे वीज खरेदी करार केलेले आहेत आणि त्यापैकी ५४८ मे.वॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झालेले असुन त्यामधून राज्यात एकूण २१७ कृषी वाहिन्यांवरील ९०,७२५ कृषी ग्राहकांना लाभ मिळत आहे.

तसेच दिनांक ०२.११.२०२२ च्या शासन निर्णयानुसार सन २०२५ पर्यंत कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यातील ३०% कृषी वाहिन्या ह्या सौर ऊर्जेवर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा एवंम उत्थान अभियान योजनेतील घटक-अ मध्ये सन २०२०-२१ साठी प्राप्त ५०० मे.वॅ. क्षमतेचे विकेंद्रित ग्रीड सलंग्नित सौर प्रकल्पांसाठी परवानगीनुसार

महावितरणने २०१.५ मे.वॅ. क्षमतेचे कार्यादेश देण्यात आले असून, त्यापैकी ३१ मे.वॅ. क्षमतेचे वीज खरेदी करार करण्यात आले आहेत. तसेच घटक-ब अंतर्गत महाऊर्जामार्फत पारेषण विरहीत सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येत असून, ४५००० सौरपंप जाने-२०२३ अखेर कार्यान्वित करण्यात आले आहेत व घटक-क मध्ये सन २०२०-२१ साठी २,५०,००० ग्रीड संलग्नित सौर पंपासाठी मंजुरी प्रदान केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.